महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

**मासं/रवका/न.क्र.०५**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - २४०७७४४१

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६६४ दिनांक २१.१२.२०२३

**विषय :** तारमार्ग कर्मचाऱ्यांना वाहनभत्ता म्हणून अदा करण्यात येणाऱ्या इंधनाच्या प्रमाणात वाढ करणेबाबत.

**संदर्भ :** १) सामान्य आदेश क्र.१५१ (क) दि.३१.१२.१९९८.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.१५२ दि.१७.०५.२००८.

-----

सामान्य आदेश क्र.१५१ (क) दि.३१.१२.१९९८ अन्वये पूर्वीच्या मंडळात व तद्नंतर कंपनीत कार्यरत वेतनगट ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांना वाहनभत्ता अदा करण्यात येतो. सदर वाहनभत्ता अदा करावयाच्या कार्यपद्धतीत बदल करुन प्रशासकीय परिपत्रक क्र.१५२ दि.१७.०५.२००८ अन्वये इंधनाच्या प्रमाणात देण्यात येतो.

२. तारमार्गावर काम करणाऱ्या तांत्रिक कर्मचाऱ्यांचे कामकाज व दैनंदिन कामे पूर्ण करण्यासाठी त्यांच्या कार्यक्षेत्रात दुचाकी वाहनाने करावा लागणारा प्रवास पाहता जागतिक स्थिती प्रणालीच्या (जी.पी.एस.) आधारे वाहन भत्ता दि.०१ जानेवारी २०२० पासून लागू करण्याबाबत वेतन पुर्ननिर्धारण करारावेळी व्यवस्थापन व कर्मचारी संघटनांकडून मान्य करण्यात आले होते. तथापि, जागतिक स्थिती प्रणाली (जी.पी.एस.) कार्यान्वित करण्यासंदर्भातील विविध तांत्रिक व भौगोलिक अडचणी पाहता त्याची अंमलबजावणी करण्यास विलंब होत आहे. यास्तव कार्यरत तारमार्ग कर्मचाऱ्यांना त्यांचे दैनंदिन कामकाजासाठी सन २०१८-२०२३ या कालावधीकरिता झालेल्या वेतन पुर्ननिर्धारण करारातील अटी व शर्तीनुसार मासिक वाहन भत्त्यापोटी इंधन लिटरच्या संख्येमध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन होता.

३. आता, प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प), संचालक (वाणिज्य) व संचालक (मासं) यांचेशी विचारविनियम करुन तारमार्ग कर्मचाऱ्यांना वाहनभत्यापोटी सद्यस्थितीत अनुज्ञेय असलेल्या इंधनाच्या प्रमाणात खालीलप्रमाणे वाढ करण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे.

क) वेतनगट ३ मधील कार्यरत तारमार्ग कर्मचाऱ्यांना प्रतिमाह ०४ लिटर.
ख) वेतनगट ४ मधील कार्यरत तारमार्ग कर्मचाऱ्यांना प्रतिमाह ०३ लिटर.

४. ज्या ठिकाणी कंपनीचे वाहन उपलब्ध आहे व कर्मचारी कंपनीच्या कामासाठी आपल्या स्वत:च्या खाजगी वाहनाचा वापर करीत नसल्यास अशा कर्मचाऱ्यास वाहनभत्यातील सदर वाढ अनुज्ञेय राहणार नाही. तथापि, ज्या ठिकाणी कंपनीचे वाहन उपलब्ध आहे व कर्मचारी कंपनीच्या कामासाठी स्वत:च्या खाजगी वाहनाचा वापर करीत असल्यास संबंधीत कर्मचाऱ्यास वाहन भत्यातील वाढ लागू करण्यासाठी त्या त्या विभागाचे कार्यकारी अभियंता हे सक्षम अधिकारी असतील.

५.	सामान्य आदेश क्र.१५१ (क) दि.३१.१२.१९९८ मधील इतर सर्व तरतुदी अबाधित ठेवण्यात येत असून वाहनभत्ता अदा करावयाच्या कार्यपद्धतीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. उपरोक्त सुधारीत दर दि.०१.०१.२०२० पासून लागू राहतील. तसेच थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबतची कार्यवाही संबंधीत कर्मचारी कार्यरत असलेल्या कार्यालयांमार्फत करण्यात यावी.

६.	सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/(मासं)/(पायाभूत आराखडा/ विशेष प्रकल्प)/(देयके व वसूली)/(वितरण)/(वित्त व लेखा)/ म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी अधिकारी/मुख्य तपास अधिकारी/कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) मुख्य अभियंता (देयके व महसुल), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

...२

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : managerpom@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - ६९४२५१४१

क्र. मासंवि/रवका/न.क्र.०५/ **३६८७१**  दिनांक : **२६.११.२०२४**

ई-मेलव्दारे

प्रति,
मुख्य अभियंता
म.रा.वि.वि.कं.मर्या.
परिमंडळ कार्यालय (सर्व)

**विषय :** वेतनगट ३ मधील तारमार्ग कर्मचाऱ्यांना वाहनभत्ता अदा करणेबाबत मार्गदर्शक सूचना.

******

उपरोक्त विषयांस अनुसरुन सा.आ.क्र. ९०(क) दि. ३१.०३.१९७९ मधील तरतुदींनुसार कंपनीतील विविध पदांवर कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना वाहनभत्ता अदा केला जातो. तसेच सा.आ.क्र. ९०(क) दि. ३१.०३.१९७९ चे सुधारपत्र क्र. ७ दि. ३०.०६.१९८३ नुसार वेतनगट ३ मधील तारमार्ग तसेच इतर संवर्गातील काही विशिष्ट पदांवर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना ठराविक रक्कमेच्या स्वरूपात वाहनभत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे. तदनंतर सदर पध्दतीमध्ये बदल करून प्रशासकीय परिपत्रक क्र. १५२ दि. १७.०५.२००८ अन्वये वाहनभत्ता हा इंधनाच्या प्रमाणात अदा करण्याची व इंधनाचा दर निश्चित करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार उपरोक्त सुधारपत्र क्र. ७ दि. ३०.०६.१९८३ मध्ये नमूद केलेल्या पदावरील कर्मचाऱ्यांना ७ लिटर वाहनभत्ता देय आहे.

२. सदर प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, सा.आ.क्र. ९०(क) दि. ३१.०३.१९७९ चे सुधारपत्र क्र. ७ दि. ३०.०६.१९८३ नुसार क्षेत्रिय कार्यालयातील वेतनगट ३ मधील ज्या तारमार्ग कर्मचाऱ्यांना ७ लिटर वाहनभत्ता मंजूर करण्यात आला आहे व माहे जानेवारी २०२० व तदनंतर ७ लिटर वाहनभत्ता अदा करण्यात येत होता अशा कर्मचाऱ्यांना प्रशासकीय परिपत्रक क्र. ६६४ दि. २१.१२.२०२३ अन्वये करण्यात आलेली ४ लिटर वाढ विचारात घेउन ११ लिटर (७+४) वाहनभत्ता प्रचलित नियमानुसार अदा करण्यात यावा.

३. सबब, सदरची बाब आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना अवगत करण्यात यावी.

(भूषण कुलकर्णी)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (मासं),म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.

२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/ कल्याण.

३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य अभियंता (स्थापत्य),म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक, प्रशिक्षण व सुरक्षा, म.रा.वि.वि.कं.मर्या. एकलहरे, नाशिक.